॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.३० ( ) आपत्ती व्यवस्थापन शिबिरात तुम्ही जे शिकाल त्याची अंमलबजावणी तुमच्या परिसरात जेव्हा अशी एखादी आपत्ती उद्‌भवेल तेव्हा तातडीने करण्याची जबाबदारी तुमच्यावर येवून पडली आहे, असे प्रतिपादन आव्हान-२०१९ शिबिरासाठीच्या पूर्व तयारी व सराव शिबीर प्रसंगी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे नांदेड येथे होणाऱ्या `आव्हान-२०१९` आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणासाठी विद्यापीठाच्या संघाचे प्रशिक्षण व सराव शिबिराचे आज दि. ३० मे रोजी अधिसभागृहात आयोजन करण्यात आले. या प्रशिक्षण व सराव शिबिराचे उद्‌घाटन कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, प्रा.नितीन बारी, कुलसचिव भ.भा.पाटील, वित्त व लेखाधिकारी एस.आर.गोहिल, रासेयो संचालक प्रा.पंकजकुमार नन्नवरे उपस्थित होते.

कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील म्हणाले की, अलिकडच्या काळात आपत्ती व्यवस्थापनाचे महत्व वाढीला लागले आहे. सरकारने आपत्ती व्यवस्थापनाचा कायदा देखील केला आहे. नैसर्गिक आणि मानव निर्मित अशा दोन आपत्ती उद्‌भवत असतात. कोणतीही आपत्ती सांगून येत नाही. अशावेळी कायम आपण सजग राहायला हवे. पर्यावरणाची हानी, वाढते तापमान यामुळे नैसर्गिक समतोल बिघडत चालला आहे, अशावेळी कोणत्याही प्रकारच्या आपत्तीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनाचे धडे घेतलेल्या विद्यार्थ्यांकडून समाजाच्या अपेक्षा वाढल्या आहेत. त्या पूर्ण करण्याची जबाबदारी तुम्ही निश्चितच पेलाल असा आशावाद त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रा.नितीन बारी यावेळी म्हणाले की, आपत्ती व्यवस्थापन विषयी समाजात जनजागृती होणे आवश्यक आहे. आयुष्यातील आव्हाने पेलण्याची नवी दिशा आव्हान सारख्या शिबिरातून मिळत असल्याचे त्यांनी सांगितले.

दि. ३ ते १३ जून या कालावधीत नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात आव्हान-२०१९ आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर होत आहे. या शिबीरात विद्यापीठाचा ९६ व्यक्तींचा संघ सहभागी होत असून जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्हयातून प्रत्येकी ६० मुले व ३० मुली तसेच तीन पुरुष व महिला कार्यक्रम अधिकारी यांचा समावेश राहणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.पंकजकुमार नन्नवरे यांनी केले. सुत्रसंचालन व आभार सुभाष पवार यांनी मानले.

---

जा.क्र: कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : ३० मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
जनसंपर्क अधिकारी
यांच्या करिता